नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०१/२०२६ (गुरूवार )

---

## २४ किलो गांजा सह, ३ मोबाईल, ट्रॉली बॅग आणि रोख रक्कम असा ५ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त, आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद,आरोपी अटक नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०७/०१/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे नागपुर ते जबलपुर रोडने पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने अंमली पदार्थ गांजा बाबत खात्रीशिर माहीती दिली. नमुद पथकाने सदर माहीती कन्हान पोलीसांना देत कन्हान पोलीसांसह सयुंक्तीक कारवाई करत मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद आरोपी शोध घेणे कामी सतर्क पेट्रोलींग केली. सदर पथकाला पोस्टे कन्हान हद्दीतील टेकाडी उडाण पुला जवळील ,हनुमान मंदिर बस स्टॉप जवळ दोन ईसम ट्राली बॅग घेवुन संशयितरित्या उभे दिसले. नमुद इसमांना विचारपुस करता त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे दिले. त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलीसांनी पंचासमक्ष त्यांचेकडील दोन ट्रॉली बॅगची झडती घेतली असता त्यात अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. नमुद आरोपीतांना नाव पत्ता विचारले असता १) अमीत रामदीन रयकवार, वय.३४ वर्षे, रा. ग्राम करवी, जि. चित्रकुट, राज्य उत्तरप्रदेश, २) अमितेंद्र उर्फ जितु जयकरणसिंह यादव, वय. २८ वर्षे, रा. एच.पी. पेट्रोलपंप जवळ, यादव डेरा, ग्राम पैलानी ,डेरा पैलानी , जि.बांदा , राज्य उत्तरप्रदेश अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.

**नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) अंमली पदार्थ गांजा २४.२५० किलोग्रॅम किंमती ४,८५,०००/—रुपय , ०३ मोबाईल ४५,०००/— रुपये, ०२ ट्रॉली बॅग , ६२०/— रुपयांचा रोख रक्कम असा एकुण ५,३४,६२० /— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात**

**आला आहे. अंमली पदार्थ गांजा पुरवाठा करणारा आरोपीबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली असुन पोलीस त्याचा शोध घेत आहे.**

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कन्हान येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपींना अटक करण्यात आली आहे.**



## मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी टोळीने अवैध दारूचा व्यावसाय करणाऱ्या आरोपीतांना १ वर्षाकरीता केले हद्दपार

**पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील टोळीने अवैध दारू काढणारे, विक्री करणारे तसेच अवैध दारू व्यवसायात सक्रिय आरोपीतांच्या २ टोळी मधील ५ सदस्यांविरूध्द मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी हद्दपारीचे आदेश काढले आहे.**

पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत अवैध दारू व्यवसायात सक्रिय खालील टोळीतील सदस्यांना नागपुर ग्रामीण हद्दीतून १ वर्षाकरीता हद्दपार करण्यात आले आहे.

टोळी क्रं १ ची **टोळी प्रमुख १) महीला आरोपी आणि टोळी सदस्य २) अमरसिंग अमऱ्या राजपुत, वय ४० वर्ष, सर्व रा. डोंगरगाव, ता. काटोल जि. नागपूर यांचेवर** हातभट्टी मोहाफुल गावठी दारू तयार करून विक्रीचे अनेक गुन्हे दाखल आहेत ते टोळीने एकत्रीत गुन्हे करण्याचे सवयीचे आहेत. टोळी क्रं २ मधील **टोळी प्रमुख १) रामु करण राजपुत, वय ५० वर्ष टोळी सदस्य २) महीला आरोपी आणि ३) रमण भागवत पवार, वय ६० वर्ष, सर्व रा. डोंगरगाव, ता. काटोल जि. नागपूर यांचेवर सुध्दा** हातभट्टी मोहाफुल गावठी दारू तयार करून विक्रीचे अनेक गुन्हे दाखल आहेत ते टोळीने एकत्रीत गुन्हे करण्याचे सवयीचे आहेत. नमुद आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीतांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे वर नमुद २ टोळीतील ५ आरोपीतांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव काटोल पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने मा.पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद ५ आरोपीतांना १ वर्षाकरीता नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.



अमरसिंग अमऱ्या राजपुत



रामु करण राजपुत



**रमण भागवत पवार**

# अवैधरित्या विनापरवाना विदेशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ०३ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०७/०१/२०२६ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, **कारने अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ पोलीस स्टेशन केळवद समोर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान स्विफ्ट डीझायर कार क्र. एम एच ३१ ई क्यु ११०१ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात विदेशी दारू मिळुन आली. **आरोपी नामे सुनिल अलीप्रसाद ऊईके, वय ५१ वर्ष, रा. राणी दुर्गावती चौक, गोंड मोहल्ला, नागपुर, ता. नागपुर हा अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष OLD MONK RUM विदेशी दारू किंमती १७,२३२/— रूपये आणि स्विफ्ट डीझायर कार क्र. एम एच ३१ ई क्यु ११०१ किमती ३,५०,०००/— रूपये असा एकुण किंमती ३,६७,२३२/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन केळवद येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह ४० लाख ४० हजारांचा मुद्‌देमाल जप्त उपविभागिय पोलीस अधिकारी,उमरेड यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक ०७/०१/२०२६ रोजी श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी,उमरेड या उमरेड उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना मौजा कुही फाटा ते नागपूर ते उमरेड जाणारा हायवे वरील पुलाजवळ टिप्पर क्र एम. एच.४९ बी.झेड. ७८५० हे वाहन मिळून आले. वाहन संशयीत वाटल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर**चा चालक नामे रितीक चंद्रशेखर ढोणे, वय २४ वर्ष, रा. रानमांगली, ता. भिवापुर २) क्लिनर नामे अमन करमचंद्र दुपारे, वय १९ वर्ष, रा. दिघोरा वार्ड क्र. २, ता. भिवापुर हे मिळुन आले. मालकाचे नाव विचारले असता वाहन मालक आरोपी क्रं ३ मंगेश कोल्हे, रा. खरबी, नागपुर,हा असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी आरोपीतांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष वर नमुद वाहन १) एम. एच.४९ बी.झेड. ७८५० किंमती ४०,००,०००/— रूपये २) ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये ३) एक मोबाईल किंमती १०,०००/—रूपये असा एकुण ४०,४०,०००/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे कुही येथे कलम ३०३(२), ४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद वाहनासह १५ लाख ३० हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०७/०१/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी पोस्टे टी पॉईंट भिवापुर येथे नाकाबंदी केली असता वाहन टिप्पर क्र. एम एच —४९/ए टी— ५७७५ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर**चा चालक नामे १) खेमचंद रामप्रकाश यादव, वय ३६ वर्ष, रा. भवानी नगर नागपूर हा मिळुन आला वाहन मालाकचे नाव विचारले असता २) वाहन मालक नामे लक्ष्मण गेंदलाल राऊत रा. पारडी नागपूर अशी माहीती पोलीसांनी प्राप्त झाली. वाहन मालकाच्या सांगण्यावरून वाहन चालक अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याची माहीती प्राप्त झाली.** तसेच पोलीसांनी आरोपीतांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर (ट्रक) क्र एमएच ४९ एटी ५७७५ किंमती १५,००,०००/—रूपये २) ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये असा एकुण १५,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३ (२), ४९, ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलीस ठाणे कुही हद्दीतील मौजा चांपा बेळा शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपीतांवर ३ गुन्हे नोंद १ लाख ५२ हजारांचा मुद्देमाल जप्त

**पोलीस स्टेशन कुही**:— दिनांक ०७/०१/२०२६ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, मौजा चांपा बेळा शिवार येथे मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच कुही पोलीसांनी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांना माहीती देवुन त्यांच्या मार्गदर्शनात उमरेड उपविभातील अधिकारी /अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकासह नमुद ठिकाणी जावुन संयुक्त कारवाई केली असता **तीन महीला आरोपी या** मोहाफुल रसायन सडवा आणि मोहाफुलाची गावठी दारूची बाळगुन मिळुन आल्या. तिन महीला आरोपींवर कारवाई करत आरोपीतांचे ताब्यातून १) ३८०० लिटर मोहाफुल सडवा रसायन ,२) ९० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती ३) एक लोखंडी ड्रम, प्लास्टिक ड्रम इतर साहित्य असा एकुण १,५२,०००/— रूपयांचा मुद्देमाल मळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

# नागपूर ग्रामीण जिल्हयात साजरा करण्यात आला 'रेझिंग डे' सप्ताह

२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्य पोलिस दलाच्या स्थापने निमित्य वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र सरकारने हा दिवस अधिकृतरित्या पोलिस रेझिंग डे म्हणून घोषित केला असून, दिनांक ०२ ते ०८ जानेवारी पर्यंत रेझिंग डे सप्ताहाअंतर्गत जिल्हयामध्ये विविध कार्यक्रम घेण्यात आले. आज दिनांक ०८/०१/२०२६ रोजी रेझिंग डे' सप्तहा  अंतर्गत नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे खालील कार्यक्रम घेण्यात आले आहे.

**विदयार्थ्यांना मार्गदर्शन**

पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत प्रकाश श्रीराम उच्च प्राथमिक शाळा वहीटोला येथे,पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत ज्ञानगंगा हायस्कुल मौदा भेट देवुन विदयार्थ्यांसोबत संवाद साधुन त्यांना सायबर क्राईम, सोशल मिडीया वापर, डायल — ११२ प्रकल्प,  गुड टच बॅड

टच, वाहतुकीचे नियम, तसेच इतर विषयांबद्दल मार्गदर्शन करून जनजागृती करण्यात आली आहे. याव्यतिरीक्त पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत बस स्टॉप येथे जावुन नागरिकांमध्ये जनजागृती केली. पोलीस स्टेशन रामटेक अंतर्गत बसस्टॉप येथे ऑटो तसेच ई रिक्षा या वाहनांना रेडीयम लावण्यात आले. चालकांना वाहतुकीचे नियम आणि रस्ते सुरक्षा इत्यादी बाबत सविस्तर माहीती दिली.






महाराष्ट्र पोलीस




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने